भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2019 ◑

AR 988641

अनु.क्र. २९५५ दि. २८/०८/१९ मु.शु.रक्कम ५००

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव ऐसा इंडस्ट्रियल ऑटोमेशन प्रा.लि.

पत्ता हिंजवडी पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव

हस्ते व्यक्तीचे नांव शशिकुमार टी आर

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

सौ. एस. डी. शिंदे
परवाना क्र. २२०१११२
चिखली, आकुर्डी, पुणे-३५

मुद्रांक विक्रेत्याची सही

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

21 AUG 2019

प्रथम मुद्रांक लिपिक कोषागार पुणे कार्यालय

NOTARY
SUDHIR SHRAWAN SONAWANE
PUNE
REGD. NO. 10404
EXPIRY DT. 24/10/2023
GOVERNMENT OF INDIA

हमीपत्र

आम्ही आइजा इंडस्ट्रीयल ऑटोमेशन इंडिया प्रा. लि. तर्फे आनंद आपटे (संचालक) व्यवसाय. Professional Consultant राहणार फ्लॅट नं. २०३, पारेकर अपार्टमेंट, शिवविहार कॉलनी, पौड रोड, पुणे. ४११०३८. सत्य प्रतिज्ञेवर हमीपत्र लिहुन देतो की, मौजे माण, ता. मुळशी, जि. पुणे, गट नं. /स. नं.

२८४/१/२. आणि २८३/२ प्लॉट नं. ६, क्षेत्र १७९६८ चौ. मी. हि मिळकत आमच्या कंपनी मालकी हक्काची असुन सदरील मिळकत आम्ही विकसित करीत आहे

१. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहीती मला / आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जगेवरील बोअरव्दारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टॅंकरव्दारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत व त्या संबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी भुजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S. And D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागार मार्फत सदर जागी पाणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणून देण्याची कार्यवाही कारणे आमच्यावर बंधनकारक राहील.

२. इमारत पुर्ण झाल्यावर इमारती मधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे पिण्यासाठी पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्याय व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतमधील रहीवाशाना मी/आम्ही हमीपत्राव्दारे स्विकारत आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे मार्फत कोणताही पाणी पुरवठा न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी/आम्ही कोणत्याही कोर्टकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

३. निवासीं अगर व्यापारी गाळयाचे विक्रीचे करताना येणाऱ्या करारनामा मध्ये पाणी पुरवठयाची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थितीचे जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुध्दा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणीपुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे चा पुरेशा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत माझया/आमच्या खर्चाने पुरेशा पाणीपुरवठा करून देण्याची माझी/आमची जबाबदारी राहील.

४. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण निवासी अगर व्यापारी गाळयाचे विक्रीचे करताना येणाऱ्या करारनामा मध्ये पाणी पुरवठयाची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थितीचे जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुध्दा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर नियोजित गाळेधारकांना पाणीपुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे चा पुरेशा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत माझया/आमच्या खर्चाने पुरेशा पाणीपुरवठा करून देण्याची माझी/आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे ला तोषीस लागू देणार नाही.

५. टॅंकरव्दारा किंवा बोअरव्दारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतुन तपासुन आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यास येईल. याची मी/आम्ही काळजी घेईन/घेऊ.

६. सदरची योजना संपुर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी/आमचे अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक/ प्रवर्तकास या हमी पत्रातील सर्व बाबींचे लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यातील करण्यात येईल याची घेईन /घेऊ.

७. हे हमीपत्र माझे/आमचे वाली वारसांवर बंधनकारक राहील.

८. सदर फ्लॅटमधील संदर्भातील कोणत्याही करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल. व हे हमीपत्र करानाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी/आम्ही राजीखुषीने दि. २८/०८/२०१९ रोजी लिहून दिले आहे.

हमीपत्र लिहून देणार

आइजा इंडस्टीयल ॲटोमोशन इंडिया प्रा. लि

AISA Industrial Automation India Pvt. Ltd. PUNE

आंनद आपटे.(संचालक)

NOTARY SUDHIR SHRAWAN SONAWANE PUNE REGD. NO. 10404 EXPIRY DT. 24/10/2023 GOVERNMENT OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL